# महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धा

## ३१ ऑगस्ट पर्यंत प्रवेशिका पाठविण्याची मुदत

---

**मुंबई,** दि. १ ऑगस्ट : शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने येत्या ६ नोव्हेंबर २०१७ पासून सुरु होणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धांसाठी हौशी नाट्य संस्थांकडून दिनांक १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

५७ व्या हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ पासून महाराष्ट्र राज्यातील विविध स्पर्धा केंद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच १५ व्या बालनाट्य स्पर्धांची प्राथमिक फेरी ४ डिसेंबर, २०१७ पासून एकूण पाच महसूली विभागात आयोजित करण्यात येणार आहे.

हिंदी, संगीत आणि संस्कृत भाषेतील नाट्य स्पर्धा जानेवारी २०१८ मध्ये आयोजित करण्यात येतील.

बालनाट्य वगळता इतर नाट्य स्पर्धेकरीता रु.३,०००/- तसेच बालनाट्य स्पर्धेकरीता रु.१,०००/- इतक्या अनामत रकमेचा धनाकर्ष स्पर्धक संस्थेने संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावे पाठवावयाचा आहे. प्रयोग सादर केल्यानंतर त्याच रकमेचा धनाकर्ष (डीडी) संस्थांना परत करण्यात येईल.

गतवर्षी स्पर्धेत नियमांचे उल्लंघन केलेल्या तसेच कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर प्रयोग न करणाऱ्या नाट्यसंस्थांना यावर्षी स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ‘नवीन संदेश’ या मथळयाखाली उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका दि. ३० ऑगस्ट, २०१७ पर्यंत खालील पत्त्यावर सादर कराव्यात.

१) मुंबई, कोकण व नाशिक विभागातील संस्थांनी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई-३२ (०२२-२२०४३५५०) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

२) पुणे महसूल विभागातील संस्थांनी, सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, बंगला क्रमांक-४, विमानतळ रोड, पुणे (०२०-२०२७१३०१) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

३) औरंगाबाद महसूल विभागातील संस्थांनी सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, रुम नंबर-०२, एमटीडीसी बिल्डिंग, गोल्डी टॉकीजच्या समोर, स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१००५ (०२४०-२३३९०५५) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

४) नागपूर व अमरावती महसूल विभागातील संस्थांनी सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, द्वारा : अभिरक्षक, मध्यवर्ती संग्रहालय, अस्थायी प्रदर्शन हॉल, तळमजला, सिव्हिल लाईन, नागपूर-४४०००१ (०७१२-२५५४२११) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रवेशिका कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशिल भरला नसल्यास प्रवेशिका अपात्र ठरविण्यात येईल. प्रवेशिकेतील त्रुटींच्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व स्पर्धक संस्थांनी कृपया नोंद घ्यावी.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरीता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल, असे संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयाने कळविले आहे.

---

# महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धा

(२०१७-२०१८)

## स्पर्धांचे नियम

महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवांतर्गत नाटयस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या नाटयसंस्थांचे अर्ज त्या संस्था खालील नियम व अटी पूर्ण करीत असतील तरच विचारात घेण्यात येतील :-

## पात्रता

**१ (अ)** संस्था कमीतकमी दोन वर्षे अस्तित्वात असली पाहिजे.

**(ब)** (१) संस्था नोंदणी अधिनियम (Maharashtra co-op Society Registration Act, 1960) किंवा सार्वजनिक न्यास अधिनियम (Bombay public Trust Act, 1950) या अन्वये नोंदविलेली असली पाहिजे व अर्जात नोंदणीचा दिनांक व क्रमांक दिला पाहिजे.

२. किंवा ती संस्था, महाराष्ट्रातील विद्यापीठास संलग्न असलेल्या कोणत्याही महाविद्यालयाची नाटयशाखा असली पाहिजे.

३. किंवा ती संस्था, संस्कृत पाठशाला किंवा माध्यमिक शाळा असली पाहिजे (संस्कृत नाटयस्पर्धेसाठी फक्त)

४. अथवा सरकारी किंवा निमसरकारी खात्यातील कर्मचाऱ्यांची मान्य संघटना किंवा तिचा नाटय, सांस्कृतिक विभाग असला पाहिजे.

५. संस्कृत नाटयस्पर्धेखेरीज इतर स्पर्धेत प्राथमिक वा माध्यमिक शाळांना प्रवेश मिळणार नाही.

**(क)** संस्था व्यावसायिक नाटक मंडळी असू नये.

## खुलासा

एखादी नाटयसंस्था खाजगी मालकीची किंवा एकापेक्षा जास्त व्यक्तींनी भागीदारीत चालविलेली असली पाहिजे, मुख्यतः आर्थिक नफ्याच्या दृष्टीने ती चालविलेली असली तर ती संस्था व्यावसायिक नाटक मंडळी मानण्यात येईल.

**(ड)** महाराष्ट्र राज्य नाटयस्पर्धेसाठी सुचविण्यात आलेल्या नाटकात काम करणारे सर्व कलाकार हौशी असले पाहिजेत व ते सर्व त्या संस्थेचे अधिकृत सभासद असले पाहिजेत.

## खुलासा

जो कलाकार स्वतःच्या उपजीविकेसाठी, मुख्यतः नाटकातल्या किंवा सिनेमातल्या कामावर अवलंबून नसेल त्यास हौशी कलाकार मानण्यात येईल. ज्या कलाकाराने नाटयस्पर्धेत भाग घेण्यापूर्वीच्या संपूर्ण काळात तीन महिन्यांपेक्षा अधिक काळात नाटक किंवा सिनेमा कंपनीत मासिक वेतनावर किंवा करार पध्दतीवर काम केले असेल किंवा रात्र वेतनावर ९० पेक्षा अधिक प्रयोगांत काम केले असेल त्यास हौशी कलाकार मानण्यात येणार नाही. एखादा

कलाकार धंदेवाईक नट म्हणून नाटक किंवा सिनेमा कंपनीत काम करुन सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याला हौशी कलाकार समजण्यात येणार नाही व याबाबत त्याचा सेवानिवृत्तीनंतरचा काळही विचारात घेतला जाणार नाही.

**(इ)** संस्थेच्या घटनेत तिच्या ध्येय आणि उद्देशांमध्ये सांस्कृतिक कार्याची अभिवृध्दी हा एक उद्देश असला पाहिजे किंवा संस्थेच्या घटनेत संस्थेचा घटनात्मकरित्या स्थापना झालेला असा नाटय विभाग किंवा सांस्कृतिक विभाग असला पाहिजे ही अट वरील नियम (ब) मधील (२) (३) व (४) कलमांना लागू नाही.

**(ई)** अर्ज स्विकारावयाच्या अखेरच्या तारखेपासून आधीच्या १ वर्षाच्या काळात संस्थेचे कमीतकमी दोन तरी नाटयप्रयोग झालेले असले पाहिजेत. दोन किंवा अधिक एकांकिका एकाच वेळेस सादर केल्यास तो एक नाटयप्रयोग धरला जाईल.

**(फ)** नियम (१) ब (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संघटनाच्या नाटकांत त्या संघटनेच्या कर्मचाऱ्यांखेरीज इतरांस काम करता येणार नाही, मात्र अशा संस्थेच्या नाटय वा सांस्कृतिक विभागाच्या घटनेप्रमाणे बाहेरचे सभासद घेता आले तर अशा सभासद कलाकारांना त्या संस्थेच्या नाटकात काम करता येईल.

**(ग)** महाराष्ट्राबाहेरील नोंदविलेल्या संस्था मराठी नाटयस्पर्धेचे नियम व अटी पूर्ण करीत असतील तर त्यांना फक्त मराठी नाटयस्पर्धेत भाग घेता येईल. इतर राज्यातील विधिनियम आणि इतर परिस्थितीला अनुसरुन अशा संस्थांना नाटयस्पर्धेकरिता पात्र ठरविण्याचा अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना राहील.

**(ह)** कोणत्याही भाषेतील स्पर्धा भरविण्यास कमीतकमी पाच स्विकारपात्र प्रवेशिका आल्या पाहिजेत.

## प्रवेशिका

२. **(अ)** नाटयस्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थेला त्यांनी योजिलेल्या नाटकांच्या पुस्तकाची एक सुवाच्य प्रत प्रवेशिकेसोबत द्यावी लागेल. प्रत सुवाच्य नसल्यास, प्रवेशिका स्विकारली जाणार नाही.

**(ब)** (१) संस्थेला त्यांनी योजिलेल्या नाटकाच्या बाबतीत रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र पाठवावे लागेल. असे प्रमाणपत्र प्रवेशिकेबरोबर नसेल तर प्रवेशिका स्विकारण्यात येणार नाही.

(२) नवीन नाट्यसंहितांना प्रोत्साहन देण्यासाठी असलेली मागील तीन वर्षाची अट आता शिथिल करण्यात येत असून संस्था कोणतीही संहिता निवडू शकेल, परंतु मागील तीन वर्षांची संहिता (दि.१ जानेवारी २०१४ ते अर्ज करेपर्यंत) असल्यास परीक्षणामध्ये एकूण गुणात ५ गुण अधिक दिले जातील.

**(क)** प्रवेशिकेबरोबर जोडलेल्या कागदपत्रांत संस्थेला आपल्या नाटकात काम करणाऱ्या सर्व कलाकारांची संपूर्ण व बरोबर नावे ते करीत असलेल्या भूमिकांच्या निर्देशासहित पाठवावी लागतील. नाटकाच्या दिग्दर्शनाची तसेच नेपथ्य आणि ध्वनी व प्रकाश योजनांची जबाबदारी उचलणाऱ्या व्यक्तिंचीही नावे पाठवावी लागतील. नंतर त्यात काही बदल झाल्यास सुधारित नावे स्पर्धा सुरु होण्यापूर्वीच तीन आठवडे अगोदर पाठवावी लागतील.

**(ड)** नाटकाच्या प्रतीत तसा खास उल्लेख असल्याशिवाय नाटकात स्त्रीपात्राची भूमिका पुरुष करणार असेल किंवा पुरुषपात्राची भूमिका स्त्री करणार असेल तर कोणत्याही संस्थेची

प्रवेशिका नाटयमहोत्सवात स्विकारली जाणार नाही. हा नियम फक्त संस्कृत नाटयस्पर्धेकरिता आणि तोही फक्त शालेय संस्थांसाठी शिथिल करण्यात येईल.

**(इ)** संस्थेला त्यांनी योजिलेल्या नाटकाचे स्वरुप विशेषत: ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरित आहे किंवा दुस-या नाटकांचे रुपांतर आहे हे मूळ नाटकाचे लेखक, त्या मूळ नाटकाची भाषा यांचा निर्देश करुन कळवावे लागेल. नाटक, कथा, कादंबरी इत्यादी अन्य वाङ्मय प्रकारांवर आधारित असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल. संस्थेला त्यांनी योजिलेल्या **नाटक नवीन असल्यास व ते नाटयमहोत्सवाकरिता खास लिहिलेले असल्यास, तसा स्पष्ट उल्लेख करावा लागेल.**

**(ई)** संस्कृत नाटयस्पर्धेत भाग घेणारी संस्था, पाठशाळा किंवा माध्यमिक शाळा असली तर, त्या शाळेने सादर केलेल्या नाटकात अध्यापकांना किंवा माजी विद्यार्थ्यांना भाग घेता येणार नाही. त्यांनी तसा भाग घेतल्यास, ती संस्था शालेयेत्तर संस्था मानली जाईल व राखीव पारितोषिकास अपात्र ठरविण्यात येईल.

**(फ)** नाटयस्पर्धक संस्थेकडून अनामत रक्कम म्हणून रुपये ३,०००/- इतकी रक्कम रोख धनाकर्ष (डिडि) स्वरुपात प्रवेशिकेसोबत घेण्यात येईल. तसेच ज्या संस्था पूर्ण प्रयोग सादर करतील त्यांची अनामत रक्कम परत करण्यात येईल. आणि ज्या संस्था ऐनवेळी प्रयोग रद्द करतील त्यांच्या अनामत रकमा शासकीय कोषागारात जमा करण्यात येतील. धनाकर्ष संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावे देण्यात यावा.

**(ग)** प्राथमिक फेरीत पूर्ण नाटयप्रयोग सादर करणाऱ्या स्पर्धक संस्थेस नेपथ्य, ध्वनी व प्रकाश योजना, साहित्यांची वाहतूक, हमाली, नाटकाचे आकर्षक सेट्स इत्यादीसाठी नाटय निर्मिती खर्च म्हणून रुपये ६,०००/- इतकी रक्कम देण्यात येईल.

## नाटकाचे स्वरुप, कालमर्यादा

**३.(अ)** स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अंतिम अधिकार शासनास राहील. स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक शासनाने नाकारल्यास त्याची कारणे देण्याचे शासनावर बंधन राहणार नाही.

**(ब)** संस्थेने योजिलेले नाटक पूर्वी नाटय महोत्सवात सादर केलेले असल्यास व ते पूर्वी पारितोषिकपात्र ठरलेले असल्यास, तेच नाटक त्याच संस्थेला पुन्हा सादर करता येणार नाही.

**(क)** संस्थेला वाटल्यास एकापेक्षा अनेक पण जास्तीत जास्त तीन नाटकांची नावे क्रमवारीने नाटयस्पर्धेला सुचविता येतील. पहिल्या क्रमांकाचे नाटक शासनाने स्विकारले नाही तर इतर दिलेल्या नाटकांचा क्रमानुसार विचार करण्यात येईल.

**(ड)** नाटय महोत्सवात सादर केल्या जाणाऱ्या हौशी मराठी व हिंदी नाटकांची कालमर्यादा मध्यांतरासह दोन तासांपेक्षा कमी व तीन तासांपेक्षा जास्त राहता कामा नये. प्रत्येक मध्यातंर पंधरा मिनटांचा असेल. एका नाटकात दोन मध्यांतरांपेक्षा जास्त मध्यांतर असता कामा नयेत.

**(इ)** राज्य नाटयस्पर्धेत सादर करावयाच्या नाटकाचे त्या संस्थेने स्पर्धेपूर्वी दहापेक्षा अधिक प्रयोग केले असल्यास, ते नाटक स्पर्धेसाठी स्विकारले जाणार नाही.

**(ई)** संस्कृत नाटकात काम करणाऱ्या कलाकारांची संख्या दहापेक्षा अधिक असता कामा नये.

## नाटयसंस्थांचा प्रवास व इतर खर्च

४. नाटय महोत्सवाकरिता निवडलेल्या स्थानिक संस्थेला, प्रवासखर्च व दैनिक भत्ता देण्यात येणार नाही. परंतु ज्या संस्थांना त्यांच्या नोंदविलेल्या कार्यालयाच्या ठिकाणाहून दुसऱ्या गावी नाटक सादर करण्यास सांगितले गेल्यास, त्यांना होणारा जाण्या-येण्याचा प्रवास खर्च व जेवणा-राहण्याचा खर्च देण्यात येईल. प्रवासखर्च, रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाचा व रेल्वे नसल्यास एस.टी. च्या सर्वसाधारण दराप्रमाणे देण्यात येईल. जेवण्या-राहण्याचा खर्च दर दिवशी दरडोई रुपये १५०/- प्रमाणे देण्यात येईल. प्रत्येक संस्थेला किती दिवसांचा खर्च मिळू शकेल हे मागाहून कळविण्यात येईल. खर्चाची प्रतिपूर्ती नाटकात भाग घेणाऱ्या व प्रवेशिकेत दिल्याप्रमाणे त्यातील भूमिका करणाऱ्या कलावंतांच्या संख्येपुरतीच नियम क्र.४(ब) व (क) प्रमाणे मर्यादित असून याशिवाय दिग्दर्शक, पार्श्वसूचक, संघटक वगैरे इतर आठ जणांचा यात समावेश करता येईल. संगीतप्रधान नाटकाच्या बाबतीत जर त्या नाटकातील पात्रे रंगभूमीवर प्रत्यक्ष गात असतील तर हा खर्च बारा व्यक्तींना देण्यात येईल. प्रवेशिकेत नाटक संगीतप्रधान असल्याचा स्पष्ट उल्लेख असावयास हवा. त्याचप्रमाणे नाटकाच्या प्रतीत पद्यचरणांचा समावेश असला पाहिजे. **संस्थेने खरेदी केलेल्या रेल्वे/एसटी तिकिटांच्या सत्यप्रती दिल्यानंतरच त्यांच्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल. संस्थेने सवलतीच्या दराने रेल्वेने प्रवास केल्यास तो सवलतीचा खर्च अदा करण्यात येईल.**

**(अ)** २५० किलोमीटर किंवा त्यापेक्षा जास्त प्रवास करणाऱ्या संस्थांना शयनआसन आरक्षण खर्चसुध्दा देण्यात येईल.

**(ब)** संस्कृत नाटकातील भूमिका करणाऱ्या जास्तीत जास्त १० कलाकारांचा प्रवास खर्च देण्यात येईल.

**(क)** संस्कृत नाटयस्पर्धाव्यतिरिक्त इतर भाषांतील नाटयस्पर्धेत सादर होणाऱ्या नाटकातील भूमिका करणाऱ्या जास्तीत जास्त २० कलाकारांचा प्रवास खर्च देण्यात येईल.

**(ड)** संचालक, सांस्कृतिक कार्य यांना (ब) व (क) या नियमांत दिल्यापेक्षा अधिक कलाकार आवश्यक आहेत हयाची खात्री झाल्यास, नियम क्रमांक (ब) व (क) शिथिल करण्याचा अधिकार राहील.

**५.(अ)** प्रवेशिका विहित नमुन्यानुसार संपूर्ण आवश्यक माहिती व कागदपत्रे देऊन प्रवेशिकेच्या दिलेल्या मुदतीत पाठविली पाहिजे. दिलेल्या मुदतीत प्रवेशिका पाठविली नाही तर विचारात घेतली जाणार नाही.

**(ब)** नाटय महोत्सवाकरिता निवडल्या गेलेल्या संस्थेला आपले नाटक दिलेल्या दिवशी दिलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळी सादर करावे लागेल. कोणत्याही कारणास्तव नाटय महोत्सवाकरिता निवडले गेलेले नाटक रद्द न करण्याची हमी संस्थेला द्यावी लागेल. शासनाने सांगितल्याप्रमाणे संस्थेने प्रयोग न केल्यास, ती संस्था व संस्थेच्या नाटकात भाग घेणारे कलावंत पुढील नाटयस्पर्धेत भाग घेण्यास अपात्र आहेत असे ठरविण्यात येईल. सुधारित नियमानुसार रुपये ३,०००/- एवढी अनामत रक्कम संस्थेस परत न करता शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. अपात्रतेची कालमर्यादा एक वर्ष राहील.

**(क)** अंतिम संगीत, मराठी, हिंदी व संस्कृत नाटयस्पर्धा यात प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळविणाऱ्या संस्थांना स्पर्धेनंतर शासनाने सांगितल्यास, एक किंवा अधिक प्रयोग सादर करावे लागतील.

**(ड)** राज्य नाटय स्पर्धेतील मराठी, संस्कृत, संगीत व हिंदी नाटकांच्या अंतिम स्पर्धेत ठराविक एका विभागात सलग तीन किंवा अधिक वेळा प्रथम पारितोषिके मिळणाऱ्या कलाकारांना किंवा तंत्रज्ञान सन्माननीय विजेते समजण्यात येईल व त्यांना त्या ठराविक एका विभागात त्यानंतर पुढील पारितोषिकास अपात्र ठरविण्यात येईल. यात नाटय लेखकांचा समावेश नसेल.

**(इ)** (१) कोणत्याही कलावंताला नाटयस्पर्धेत सादर होणाऱ्या त्याच भाषेतील एकापेक्षा जास्त नाटकातून भूमिका करता येणार नाहीत. मात्र या नियमाखाली संगीत मराठी नाटकांची स्पर्धा वेगळी मानली जाईल.

(२) एका संस्थेला एकाच भाषेतील नाटयस्पर्धेसाठी स्विकारण्यात आल्यावर संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्या पूर्वसंमतीशिवाय नाटकात भाग घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत बदल करता येणार नाही.

(३) संस्थेच्या किंवा संघटनेच्या प्रवेशिकेचा नाटयस्पर्धेसाठी स्विकार करण्यात आल्यावर संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्या पूर्वसंमतीशिवाय नाटकात भाग घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत बदल करता येणार नाही.

(४) नाटयसंस्थेस शासनाकडून सुचविण्यात आल्यास, नाटकातील काही भाग किंवा वाक्ये गाळावी लागतील.

(५) अंतिम स्पर्धेसाठी निवडून येण्यासाठी संस्थेला प्रादेशिक नाटयस्पर्धेत कमीत कमी ६० इतके गुण मिळणे आवश्यक आहे.

(६) अंतिम नाटयस्पर्धेत संस्थेला पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या पारितोषिकाकरिता अनुक्रमे ७०, ६५ किंवा ६० इतके गुण मिळणे आवश्यक आहेत.

(७) संस्थेने सरासरी ४० गुणांपेक्षा कमी गुण सतत दोन वर्षे मिळविल्यास ती संस्था नाटयस्पर्धेमध्ये भाग घेण्यास एक वर्षाकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

(८) स्पर्धेच्या पारितोषिकाविषयी शासनाने घेतलेले निर्णय अंतिम राहतील.

(९) संस्थेने त्यांनी दिलेल्या प्रवेशिकेतील नियम व अटींचे बरोबर अनुकरण न केल्यास, ती संस्था पुढील नाटयस्पर्धेमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

(१०) कोणतेही कारण न देता एखादी प्रवेशिका रद्द करण्याचा अधिकार शासनास राहील.

## संगीत मराठी नाटकांच्या स्पर्धा

६. महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवाचे सर्व नियम संगीत मराठी नाटयस्पर्धांना लागू पडतील. या स्पर्धांसाठी त्यात फक्त खालील बदल करण्यात आलेले आहेत :-

**(१)** संगीत मराठी नाटकांची कालमर्यादा तीन तासांपेक्षा जास्त व ४ तासांपेक्षा कमी असावी.

**(२)** संगीत नाटकांसाठी प्रत्यक्ष भूमिका करणाऱ्या कलाकारांखेरीज दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, पार्श्वसूचक, वादक इत्यादी १२ जणांचा रेल्वे अथवा एस.टी.चा प्रत्यक्ष प्रवासाचा व राहण्याचा दरडोई रु.१५०/- प्रमाणे खर्च देण्यात येईल.

**(३)** ज्या नाटकातील संगीत पदे, गीते, इत्यादी हे नाटकातील कथावस्तू भावभावना इत्यादींचे प्रकटनाचे माध्यम आहे असे नाटक संगीत समजले जाईल. लोकनाटय हे संगीत नाटक मानले जाणार नाही.

**(४)** संगीत नाटयप्रयोगात काही विशिष्ट परिणाम साधण्यासाठी ध्वनिमुद्रित आवाज व पार्श्वसंगीताचा वापर करता येईल. परंतु पात्रांची पदे व गीते पार्श्वगायनाच्या आधारे सादर करता येणार नाहीत.

**(५)** नवीन नाट्य संहितेला प्रोत्साहन देण्यासाठी आता मागील तीन वर्षांच्या (दि.१ जानेवारी २०१४ ते अर्ज करेपर्यंत) संहितांना परिक्षणामध्ये एकूण गुणात पाच गुण अधिक दिले जातील.

**७..अ) अंतिम मराठी व मराठी संगीत** नाटयस्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक विजेते नाटक प्रादेशिक व अंतिम स्पर्धेचे केंद्र सोडून इतर जास्तीत जास्त पाच केंद्रावर सादर करावयाला हवे.

**(ब)** सदर नाटयप्रयोग सादर करण्यासाठी प्रत्येक प्रयोग सादर केल्यानंतर रुपये २०,००० प्रमाणे ५ प्रयोगांसाठी रुपये १,००,०००/- चे अनुदान देण्यात येईल. **तथापि हे अनुदान नाटकाची संहिता नवीन असले तरच देण्यात येईल.**

**(क)** यासाठी येणाऱ्या खर्चाची भरपाई करण्यासाठी अशा प्रयोगांना संस्थेस रुपये २० व रुपये १५ दराची तिकिटे लावण्यास परवानगी देण्यात येईल.

**(ड)** नाटयप्रयोग सादर करण्याची सर्व जबाबदारी संस्थेची राहील.

**(ई)** सदर नाटयप्रयोगाच्या जाहिरातीत महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवातील मराठी/संगीत नाटयस्पर्धेतील प्रथम/द्वितीय/तृतीय पारितोषिक विजेते नाटक असा समावेश असावा.

**(फ)** अनुदान मिळण्यासाठी सादर केलेल्या नाटयप्रयोगाचा पुरावा शासनास सादर करावा लागेल. प्रथम स्पर्धेचे व अंतिम स्पर्धेचे केंद्र सोडून बक्षिस समारंभानंतर सहा महिन्याच्या मुदतीत त्या संस्थेने असे नाटयप्रयोग सादर केले पाहिजेत.

**(ग)** नियम क्रमांक ४ प्रमाणे संबंधित नाटय संस्थांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

☒☒☒

# ५७ वी महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धा

**(२०१७-२०१८)**

## प्रवेशिका

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | संस्थेचा कायमचा पत्ता | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक :<br>भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक : | |
| ४ | ईमेल आयडी | |
| ५ | रु. ३,०००/- (रुपये तीन हजार) रकमेचा धनाकर्ष (डी.डी.) जोडला आहे काय ? असल्यास, धनाकर्ष क्रमांक, दिनांक तसेच बँकेचे नाव व शाखा याचा तपशील द्यावा.<br>(धनाकर्ष संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई यांचे नावे देण्यात यावा) | होय/नाही<br>धनाकर्ष (डी.डी.) क्रमांक :<br>बँकेचे नाव :<br>शाखेचे नाव : |
| ६ | संस्था नोंदविलेली असल्यास नोंदणी क्र.व दिनांक | कोणत्या कायद्याखाली :<br>नोंदणी क्रं:<br>दिनांक : |
| ७ | नोंदणीकृत नसल्यास संस्था महाराष्ट्रातील विद्यापीठास संलग्न असलेल्या कोणत्याही महाविद्यालयाची नाटयशाखा आहे का ? | होय/नाही |
| ८ | नोंदणीकृत नसल्यास सरकारी किंवा निमसरकारी खात्यातील कर्मचाऱ्यांची मान्य संघटना वा तिचा नाट्य किंवा सांस्कृतिक विभाग आहे का ? | |
| ९ | संस्था हौशी आहे काय ? | होय/नाही |
| १० | संस्था किमान २ वर्षापासून अस्तित्वात आहे काय ? (नियम क्र.१ अ) | होय /नाही |
| ११ | संस्था कोणत्या स्पर्धेत सहभागी होणार आहे (प्रत्येक स्पर्धेसाठी वेगळी प्रवेशिका भरावी) आवश्यक एका ठिकाणी होय असल्याबाबत ( ✓) अशी खूण करावी. | [ ] मराठी<br>[ ] मराठी संगीत<br>[ ] हिंदी<br>[ ] संस्कृत |

<table>
<tr><td>१२</td><td>नाटय महोत्सवात सादर करावयाच्या नाटकाचे व लेखकाचे नाव (जास्तीत जास्त ३ नावे सुचविता येतील नियम क्र.३ (क)</td><td>नाटकाचे नाव: लेखकाचे नाव:<br>१)<br>२)<br>३)</td></tr>
<tr><td>१३</td><td>नाटय स्पर्धेसाठी सूचविण्यात आलेल्या नाटकासाठी लेखकाचे परवानगी पत्रासोबत जोडले आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१४</td><td>नाटकाचे स्वरुप स्वतंत्र आहे किंवा कसे ?<br>(नियम क्र.२ इ.)</td><td><table><tr><td></td><td>स्वतंत्र</td></tr><tr><td></td><td>भाषांतरित</td></tr><tr><td></td><td>रुपांतरित</td></tr><tr><td></td><td>आधारित</td></tr></table></td></tr>
<tr><td>१५</td><td>सोबत संहिता जोडली आहे काय ?<br>नवीन संहिता असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.<br>(संहितेच्या दर्शनी भागात संस्था, नाटकाचे नांव तसेच लेखकाचे नाव नमूद करावे)</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१६</td><td>संस्था सादर करु इच्छित असलेले नाटक यापूर्वी त्याच संस्थेने या स्पर्धेत सादर केले आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१७</td><td>असल्यास हे नाटक या स्पर्धेत पारितोषिक प्राप्त ठरु शकले नाही, हे खरे आहे काय?<br>(नियम क्र. ३ ब)</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१८</td><td>या नाटकाचे या वर्षीच्या स्पर्धेपूर्वी दहापेक्षा अधिक प्रयोग झालेले नाहीत, हे खरे आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१९</td><td>असल्यास सोबतच्या नमुन्यातील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे माहिती वेगळया कागदावर देण्यात यावी .</td><td><table><tr><th>नाटकाचे नाव</th><th>वर्ष</th><th>पारितोषिकाचा क्रमांक</th><th>पारितोषिक रक्कम</th></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>२०</td><td>रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक<br>(सोबत प्रमाणपत्र जोडावे)</td><td>प्रमाणपत्र क्र:<br>दिनांक:</td></tr>
<tr><td>२१</td><td>नाटकातील सहभागी कलाकारांचे पत्ते व दूरध्वनीसह यादी जोडली आहे का ?<br>(कलाकार, तंज्ञत्र, दिग्दर्शक व इतर)</td><td>होय/नाही</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| २२ | मागील वर्षी संस्थेने या स्पर्धेसाठी प्रवेशिका सादर केली होती का ? | होय/नाही |
| २३ | असल्यास त्यावेळी संस्थेने प्रत्यक्षात प्रयोग सादर केला होता का ? | होय/नाही |
| २४ | विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे का? | होय/नाही |

**टीप:- ६ नोव्हेंबर २०१७ पासून स्पर्धेला सुरुवात होईल. प्रवेशिका वेळेत पूर्णपणे भराव्यात. त्रुटी कळविल्या जाणार नाहीत. तारीख वाढवून तसेच बदलून दिली जाणार नाही. उशिरा आलेल्या प्रवेशिका अपात्र होतील.**

स्थळ: स्वाक्षरी

दिनांक: सचिव/संस्था अध्यक्ष,

(रबरी शिक्यासह)

---

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत प्रवेशिका सादर करताना खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे-

१) संस्था नोंदणीपत्र
२) लेखकाची परवानगी
३) सेन्सॉर प्रमाणपत्र (नसल्यास एका प्रयोगाची परवानगी आवश्यक आहे)
४) रु.३,०००/- धनाकर्ष (डिडि)
५) नाटकाच्या संहितेची १ प्रत
६) कलाकार व तंत्रज्ञ यादी
७) बँकेचा तपशिल

# प्रतिज्ञापत्र

प्रति,
संचालक,
सांस्कृतिक कार्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

(१) आम्ही प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, प्रवेशिकेत भरण्यात आलेली माहिती सत्य व बरोबर आहे.

(२) आम्ही सादर करीत असलेल्या नाटकातील सर्व कलावंत प्रवेशिकेत नमूद केलेल्या अ.क्र.२४ नुसार नियम क्र. १ (ड) प्रमाणे हौशी आहेत व ते सर्व संस्थेचे अधिकृत सभासद आहेत.

(३) आम्ही नाट्यस्पर्धेच्या सर्व अटी व नियम वाचले असून त्या सर्वांचे आम्ही पालन करीत आहोत.

(४) नाट्य महोत्सवाचे नियम आम्हाला बंधनकारक आहेत.

(५) नाट्य स्पर्धेसाठी आमच्या नाटकाची निवड झाल्यास दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या तारखेस व वेळेस नाट्यप्रयोग सादर करु.

(६) काही अपरिहार्य कारणास्तव नाट्यस्पर्धा पुढे ढकलण्यात आल्यास किंवा रद्द झाल्यास संस्थेच्या झालेल्या कोणत्याही खर्चास शासन जबाबदार राहणार नाही.

(७) संस्थेने ऐनवेळी नाट्यप्रयोग रद्द केल्यास प्रवेशिकेसोबत भरलेली रु.३,०००/- ची अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

(८) परिक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम राहील, याची जाणीव ठेऊन त्याबाबत आम्ही शासनाशी केणताही पत्रव्यवहार किंवा चर्चा करणार नाही.

स्वाक्षरी

स्थळ : संस्था अध्यक्ष/सचिव

दिनांक : (रबरी शिक्क्यासह)

## कलाकारांचा पात्रपरिचय

| अ.क्र. | कलाकार व तंत्रज्ञांची नावे | वय | भूमिका |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |
| ७. | | | |
| ८. | | | |
| ९. | | | |
| १०. | | | |
| ११. | | | |
| १२. | | | |
| १३. | | | |
| १४. | | | |
| १५. | | | |
| १६. | | | |
| १७. | | | |
| १८. | | | |
| १९. | | | |
| २०. | | | |
| २१. | लेखक- | | |
| २२. | दिग्दर्शक- | | |
| २३. | प्रकाश- | | |
| २४. | नेपथ्य- | | |
| २५. | रंगभूषा- | | |

संस्थेचे नाव व शिक्का :-

# ५६ वी महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धा, २०१७-२०१८

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्थांना निर्मितीखर्च रु.६,०००/- तसेच संस्था बाहेरगावची असल्यास त्यांना देय होणारी प्रवासखर्च व दैनिक भत्त्याची रक्कम स्पर्धा संपन्न झाल्यानंतर संस्थेच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. संस्थेने खालीलप्रमाणे बँक खात्याचा तपशिल आणि रद्द केलेला धनादेश सोबत जोडावा.

| | |
|---|---|
| खातेधारक संस्थेचे नाव | |
| बँक खाते क्रमांक (A/C No.) | |
| IFSC CODE | |
| ब्रँच (Branch) | |

**संस्थेचा रद्द केलेला धनादेश येथे जोडावा.**

# महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा

## ३१ ऑगस्ट पर्यंत प्रवेशिका पाठविण्याची मुदत

---

**मुंबई,** दि. १ ऑगस्ट : शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने येत्या ४ डिसेंबर २०१७ पासून सुरु होणाऱ्या बालनाट्य स्पर्धांसाठी हौशी नाट्य संस्था/शाळा/विद्यालयांकडून दिनांक १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

१५ व्या मराठी बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक ४ डिसेंबर, २०१७ पासून महाराष्ट्र राज्यातील विविध स्पर्धा केंद्रांवर आयोजित करण्यात येणार आहे.

बालनाट्य स्पर्धेकरीता रु. १,०००/- इतक्या अनामत रकमेचा धनाकर्ष स्पर्धक संस्थेने संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावे पाठवावयाचा आहे. प्रयोग सादर केल्यानंतर त्याच रकमेचा धनाकर्ष (डीडी) संस्थांना परत करण्यात येईल.

गतवर्षी स्पर्धेत नियमांचे उल्लंघन केलेल्या तसेच कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर प्रयोग न करणाऱ्या नाट्यसंस्थांना यावर्षी स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर 'नवीन संदेश' या मथळ्याखाली उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका दि. ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत खालील पत्त्यावर सादर कराव्यात.

५) मुंबई, कोकण व नाशिक विभागातील संस्थांनी संचालक, सांस्कृतिक कार्य, जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई-३२ (०२२-२२०४३५५०) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

६) पुणे महसूल विभागातील संस्थांनी, सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, बंगला क्रमांक-४, विमानतळ रोड, पुणे (०२०-२०२७१३०१) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

७) औरंगाबाद महसूल विभागातील संस्थांनी सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, रुम नंबर-०२, एमटीडीसी बिल्डिंग, गोल्डी टॉकीजच्या समोर, स्टेशन रोड, औरंगाबाद-४३१००५ (०२४०-२३३९०५५) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

८) नागपूर व अमरावती महसूल विभागातील संस्थांनी सहाय्यक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, विभागीय कार्यालय, द्वारा : अभिरक्षक, मध्यवर्ती संग्रहालय, अस्थायी प्रदर्शन हॉल, तळमजला, सिव्हिल लाईन, नागपूर-४४०००१ (०७१२-२५५४२११) या पत्त्यावर प्रवेशिका सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रवेशिका कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशिल भरला नसल्यास प्रवेशिका अपात्र ठरविण्यात येईल. प्रवेशिकेतील त्रुटींच्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व स्पर्धक संस्थांनी कृपया नोंद घ्यावी.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरीता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल, असे संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयाने कळविले आहे.

# १५ वी महाराष्ट्र राज्य बालनाटय स्पर्धा, २०१७-२०१८

## नियम

महाराष्ट्र राज्य बालनाटय महोत्सवांतर्गत बालनाटयस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या बालनाटय संस्थांचे अर्ज खालील नियम व अटी पूर्ण करीत असतील तरच विचारात घेण्यात येतील.

## पात्रता

१. **(अ)** संस्था नोंदणीकृत असून कमीत कमी दोन वर्षे अस्तित्वात असली पाहिजे. तथापि संस्थेचे कार्य सृजनशील असून बालरंगभूमीस पोषक असल्यास हा कालावधी शिथिल करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना असतील.

**(आ)** प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय यांना प्रवेश अर्ज करता येईल. अर्जदार संस्थेस शक्यतो जिल्हा पातळीवर किमान एक पारितोषिक मिळाले असले पाहिजे.

**(इ)** कमीत कमी पाच स्वीकारपात्र प्रवेशिका आल्याखेरीज स्पर्धेचे आयोजन केले जाणार नाही.

## प्रवेशिका

२.**(अ)** बालनाटय स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थेला/शाळा/विद्यालय यांना विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

**(आ)** प्रत्येक संस्थेस/शाळा/विद्यालय जास्तीत जास्त एका बालनाटय स्पर्धेत उतरता येईल.

**(इ)** स्पर्धक संस्थांनी/शाळांनी/विद्यालयांनी योजिलेल्या नाटकाच्या संहितेची एक सुवाच्च्य प्रत प्रवेशिकेसोबत पाठवावी लागेल. प्रत सुवाच्च्य नसल्यास, प्रवेशिका स्विकारली जाणार नाही.

**(ई)** प्रवेश अर्ज भरतेवेळी स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाचा प्रयोग पूर्वी झाला असण्याची आवश्यकता नाही. नाटकाचा पहिला प्रयोगसुध्दा स्पर्धेत सादर करता येईल.

**(उ)** संस्थेला/शाळेला/विद्यालयाला त्यांनी योजिलेल्या नाटकाच्या बाबतीत रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र पाठवावे लागेल. असे प्रमाणपत्र प्रवेशिकेसोबत सादर केलेले नसेल तर प्रवेशिका स्विकारण्यात येणार नाही.

**(ऊ)** प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रात संस्थेने आपल्या नाटकात काम करणाऱ्या सर्व कलाकारांची संपूर्ण व बरोबर नावे, वय आणि ते करीत असलेल्या भूमिकांच्या निर्देशासहित पाठवावी लागतील. नाटकाच्या दिग्दर्शनाची तसेच नेपथ्य, ध्वनी व प्रकाश योजना, पार्श्वसंगीत, वेशभूषा, लेखन, रंगभूषा इत्यादीची जबाबदारी उचलणाऱ्या व्यक्तिंचीही नावे पाठवावी लागतील. नंतर त्यात काही बदल झाल्यास सुधारित नावे स्पर्धा सुरु होण्यापूर्वी तीन आठवडे अगोदर पाठवावी लागतील.

**(ए)** संस्थेला त्यांनी योजिलेल्या नाटकाचे स्वरुप विशेषत: ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरित आहे किंवा दुसऱ्या नाटकाचे रुपांतर आहे हे त्या मूळ नाटकाचे लेखक, त्या मूळ नाटकाची भाषा यांचा निर्देश इत्यादी बाबी कळवाव्या लागतील. नाटक, कथा, कादंबरी इत्यादी किंवा अन्य वाङ्‌मय प्रकारावर आधारित असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल. संस्थेला/शाळेला/विद्यालयाला त्यांनी योजिलेले नाटक नवीन असल्यास व ते बालनाटय महोत्सवाकरिता खास लिहिलेले असल्यास तसा स्पष्ट उल्लेख करावा लागेल.

**(ऐ)** बालनाटय स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या नाटकाच्या लेखकाचे अनुमतीपत्र प्रवेशिकेसोबत जोडणे आवश्यक आहे. नाटक भाषांतरित अथवा आधारित असल्यास मूळ लेखकाचेही अनुमतीपत्र प्रवेशिकेसोबत जोडावे लागेल.

**(ओ)** स्पर्धेत संस्थेला अनामत रक्कम म्हणून रुपये १,०००/- चा धनाकर्ष (डिडि) प्रवेश अर्जासोबत जोडावा लागेल. धनाकर्ष संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई यांच्या नावे देण्यात यावा.

ज्या स्पर्धक संस्था/शाळा/ विद्यालय पूर्ण बालनाटय प्रयोग सादर करतील त्यांना प्रवेशिकेसोबत अनामत रक्कम म्हणून रुपये १,०००/- चा जोडलेला धनाकर्ष परत पाठविण्यात येईल. ज्या संस्था/शाळा/विद्यालय ऐनवेळी प्रयोग रद्द करतील त्यांच्या अनामत रकमा शासकीय कोषागारात जमा करण्यात येतील.

**(औ)** पूर्ण बालनाटय प्रयोग करणाऱ्या स्पर्धक संस्थेस नेपथ्य, ध्वनी व प्रकाश योजना, साहित्याची वाहतूक, हमाली, नाटकाचे आकर्षक सेट्स इत्यादीसाठी नाटय निर्मिती खर्च म्हणून रुपये ६,००० इतकी रक्कम देण्यात येईल.

**(अ:)** १५ वर्षाखालील बालकलाकारांसाठी ही स्पर्धा आहे. तथापि, तंत्रज्ञ यांच्याबाबतची वयाची अट शिथील करण्यात येईल.

## बालनाटकाचे स्वरुप, कालमर्यादा

**३.(अ)** स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अंतिम अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना राहील. स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक संचालनालयाने नाकारल्यास त्याची कारणे देण्याचे बंधन राहणार नाही.

**(आ)** संस्थेने/शाळेने/विद्यालयाने योजिलेले बालनाटक पूर्वी बालनाटय स्पर्धेत सादर केलेले असल्यास व ते पूर्वी पारितोषिक पात्र ठरलेले असल्यास तेच बालनाटय त्याच संस्थेला / शाळेला/ विद्यालयाना पुन:सादर करता येणार नाही. मात्र इतर संस्थेला/ शाळांना / विद्यालयाना ते बालनाटय सादर करता येईल.

**(इ) कोणत्याही बालनाटयाची कालमर्यादा मध्यंतरासह ६० मिनिटांची असेल मध्यांतर जास्तीत जास्त १५ मिनिटांचे असेल. एका बालनाटयास आवश्यक असल्यास फक्त एकच मध्यांतर असेल.**

## बालनाटय संस्थांचा प्रवास व इतर खर्च

**४.(अ)** बालनाटय महोत्सवाकरिता खर्च व निवडलेल्या स्थानिक संस्थेला/शाळेला/विद्यालयांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता देण्यात येणार नाही. परंतु ज्या संस्थाना/शाळांना/विद्यालयांना त्यांच्या नोंदविलेल्या कार्यालयाच्या ठिकाणाहून दुसऱ्या गावी नाटक सादर करण्यास सांगितले गेल्यास त्यांना होणारा जाण्या-येण्याचा प्रवास खर्च देण्यात येईल. तथापि, हा खर्च प्रत्येक संस्थेच्या संघटक, दिग्दर्शक, पार्श्वसूचक, कलाकार, तंत्रज्ञ, इत्यादी २८ कलाकारांच्या मर्यादेत देण्यात येईल. **संस्थेने प्रवास केलेल्या रेल्वे/एस.टी. तिकिटांच्या सत्यप्रती देणे आवश्यक राहील.**

**(आ)** बालनाटय स्पर्धेत सादर होणाऱ्या नाटकातील भूमिका करणाऱ्या जास्तीत जास्त २० कलाकारांना रेल्वे अथवा एस.टी.चा प्रत्यक्ष प्रवास खर्च व जेवण्या-राहण्याचा दरडोई रु.१५०/- प्रमाणे खर्च देण्यात येईल.

**५.(अ)** प्रवेशिका विहित नमुन्यानुसार संपूर्ण आवश्यक माहिती व कागदपत्रे देऊन दिलेल्या मुदतीत पाठविली पाहिजे. दिलेल्या मुदतीत प्रवेशिका पाठविली नाही तर विचारात घेतली जाणार नाही.

**(आ)** बालनाटय महोत्सवाकरिता निवडल्या गेलेल्या संस्थेला/शाळेला/विद्यालयाला आपले बालनाटय दिलेल्या दिवशी, दिलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळी सादर करावे लागेल. कुठल्याही कारणास्तव बालनाटय महोत्सवाकरिता निवडले गेलेले नाटक रद्द न करण्याची हमी संस्थेला/ शाळेला/विद्यालयाला द्यावी लागेल. संस्थेने नाटक रद्द केल्यास अनामत रक्कम परत न करता शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

**(इ)** बालनाटय स्पर्धेत प्रथम क्रमाकांची पारितोषिके मिळविणाऱ्या संस्थाना/शाळांना/विद्यालयांना स्पर्धेनंतर शासनाने सांगितल्यास एक किंवा अधिक प्रयोग करावे लागतील.

**(ई)** (१) बालनाटय स्पर्धेच्या अंतिम फेरीत ठराविक एका विभागात सलग तीन किंवा अधिक वेळा प्रथम पारितोषिक मिळविणाऱ्या कलाकारांना किंवा तंत्रज्ञांना सन्माननीय विजेते समजण्यात येईल व त्यांना त्या ठराविक एका विभागाकरिता त्यानंतर पुढील पारितोषिकास अपात्र ठरविण्यात येईल. यात नाटय लेखकांचा समावेश नसेल.

(२) बालनाटय स्पर्धेत सादर होणाऱ्या बालनाटकात काम करणाऱ्या कलाकार व तंत्रज्ञ इत्यादिंना महाराष्ट्र शासनाच्या याच बालनाटयस्पर्धेतील इतर बालनाटकात काम करता येणार नाही.

(३) संस्थेच्या/शाळेच्या/विद्यालयाच्या प्रवेशिका बालनाटयस्पर्धेसाठी स्विकारण्यात आल्यावर संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्या पूर्वसंमतीशिवाय नाटकात भाग घेणाऱ्या कलाकारांच्या यादीत बदल करता येणार नाही.

(४) बालनाटय संस्थेस/शाळा/विद्यालयास शासनाकडून सुचविण्यात आल्यास, नाटकातील काही भाग किंवा वाक्ये गाळावी लागतील.

(५) अंतिम बालनाटयस्पर्धेत संस्थेला/शाळेला/विद्यालयाला पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या पारितोषिकाकरिता अनुक्रमे कमीत कमी ७०, ६५ किंवा ६० गुण असणे आवश्यक आहे.

(६) संस्थेने/शाळेने/विद्यालयाने सरासरी ४० गुणांपेक्षा कमी गुण सतत दोन वर्ष मिळविल्यास ती संस्था, शाळा, विद्यालय नाटयस्पर्धेत भाग घेण्यास एक वर्षाकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

(७) स्पर्धेच्या पारितोषिकाविषयी शासनाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

(८) संस्थेने/शाळेने/विद्यालयाने त्यांनी दिलेल्या प्रवेशिकेतील नियम व अटींचे पालन न केल्यास ती संस्था पुढील नाटयस्पर्धेमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

(९) कुठलेही कारण न देता एखादी प्रवेशिका रद्द करण्याचा अधिकार संचालकांना राहील.

☒☒☒

# १५ वी महाराष्ट्र राज्य बालनाटय स्पर्धा

(२०१७-२०१८)

## प्रवेशिका

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव | |
| २ | संस्थेचा कायमचा पत्ता | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक<br>भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक | |
| ४ | ईमेल आयडी | |
| ५ | रु. १,००० (रुपये एक हजार फक्त) रकमेचा धनाकर्ष (डी.डी.) जोडला आहे काय ?<br>असल्यास, धनाकर्ष क्रमांक, दिनांक तसेच बँकेचे नाव व शाखा याचा तपशील द्यावा.<br>(धनाकर्ष संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई यांचे नावे देण्यात यावा) | होय/नाही<br><br>धनाकर्ष क्रमांक :<br>बँकेचे नाव :<br>शाखेचे नाव : |
| ६ | संस्था नोंदविलेली असल्यास नोंदणी क्र.व दिनांक | कोणत्या कायद्याखाली :<br>नोंदणी क्रं:<br>दिनांक : |
| ७ | संस्था हौशी आहे काय ? | होय/नाही |
| ८ | संस्था किमान २ वर्षापासून अस्तित्वात आहे काय? (नियम क्र.१ अ) | होय /नाही |
| ९ | बालनाटय स्पर्धेत सादर करावयाच्या बालनाटकाचे व लेखकाचे नाव (जास्तीत जास्त ३ नावे सुचविता येतील) | बालनाटकाचे नाव:/लेखकाचे नाव:<br>१.<br><br>२.<br><br>३. |

<table>
<tr><td>१०</td><td>बालनाटय स्पर्धेसाठी सुचविण्यात आलेल्या बालनाटकासाठी लेखकाचे परवानगी पत्र सोबत जोडले आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>११</td><td>बालनाटकाचे स्वरुप स्वतंत्र आहे किंवा कसे ?<br>(नियम क्र.२ ए)</td><td><table><tr><td></td><td>स्वतंत्र</td></tr><tr><td></td><td>भाषांतरित</td></tr><tr><td></td><td>रुपांतरित</td></tr><tr><td></td><td>आधारित</td></tr></table></td></tr>
<tr><td>१२</td><td>सोबत संहिता जोडली आहे काय ?<br>(संहितेच्या दर्शनी भागात संस्था बालनाटकाचे नांव तसेच लेखकाचे नाव नमूद करावे)</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१३</td><td>संस्था सादर करु इच्छित असलेले बालनाटक यापूर्वी त्याच संस्थेने या स्पर्धेत सादर केले आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१४</td><td>असल्यास हे बालनाटक या स्पर्धेत पारितोषिक प्राप्त ठरु शकले नाही, हे खरे आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१५</td><td>या बालनाटकाचे या वर्षीच्या स्पर्धेपूर्वी दहापेक्षा अधिक प्रयोग झालेले नाहीत, हे खरे आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१६</td><td>असल्यास सोबतच्या नमुन्यातील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे माहिती वेगळया कागदावर देण्यात यावी.</td><td><table><tr><td>बाल-नाटकाचे नाव</td><td>वर्ष</td><td>पारितोषिकाचा क्रमांक</td><td>पारितोषिक रक्कम</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>१७</td><td>रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक<br>(सोबत प्रमाणपत्र जोडावे)</td><td>प्रमाणपत्र क्र:<br>दिनांक:</td></tr>
<tr><td>१८</td><td>बालनाटकातील सहभागी कलाकारांचे पत्ते व दूरध्वनीसह यादी जोडली आहे का ?<br>(कलाकार तंत्रज्ञ, दिग्दर्शक व इतर)</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१९</td><td>मागील वर्षी संस्थेने या स्पर्धेसाठी प्रवेशिका सादर केली होती का ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>२०</td><td>असल्यास त्यावेळी संस्थेने प्रत्यक्षात</td><td>होय/नाही</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | प्रयोग सादर केला होता का ? | |
| २१ | विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे का? | होय/नाही |

**टीप:- दि. ४ डिसेंबर, २०१७ पासून स्पर्धेला सुरुवात होईल. प्रवेशिका वेळेत पूर्णपणे भराव्यात. त्रुटी कळविल्या जाणार नाहीत. तारीख वाढवून तसेच बदलून दिली जाणार नाही. उशिरा आलेल्या प्रवेशिका अपात्र होतील.**

स्थळः स्वाक्षरी

दिनांकः सचिव/संस्था अध्यक्ष,

(रबरी शिक्यासह)

---

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत प्रवेशिका सादर करताना खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे-

१) संस्था नोंदणीपत्र

२) लेखकाची परवानगी

३) सेन्सॉर प्रमाणपत्र (नसल्यास एका प्रयोगाची परवानगी आवश्यक आहे)

४) रु.१,०००/- धनाकर्ष (डिडि)

५) बालनाटकाची संहितेची १ प्रत

६) कलाकार व तंत्रज्ञ यादी

७) बँकेचा तपशिल

# प्रतिज्ञापत्र

प्रति,
संचालक,
सांस्कृतिक कार्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

(१) आम्ही प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, प्रवेशिकेत भरण्यात आलेली माहिती सत्य व बरोबर आहे.

(२) आम्ही सादर करीत असलेल्या बालनाटकातील सर्व कलावंत संस्थेचे अधिकृत सभासद आहेत.

(३) आम्ही बालनाट्यस्पर्धेच्या सर्व अटी व नियम वाचले असून त्या सर्वांचे आम्ही पालन करीत आहोत.

(४) बालनाट्य स्पर्धेचे सर्व नियम आम्हाला बंधनकारक आहेत.

(५) बालनाट्य स्पर्धेसाठी आमच्या बालनाटकाची निवड झाल्यास दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या तारखेस व वेळेस नाट्यप्रयोग सादर करु.

(६) काही अपरिहार्य कारणास्तव बालनाट्यस्पर्धा पुढे ढकलण्यात आल्यास किंवा रद्द झाल्यास संस्थेच्या झालेल्या कोणत्याही खर्चास शासन जबाबदार राहणार नाही.

(७)संस्थेने ऐनवेळी बालनाट्यप्रयोग रद्द केल्यास प्रवेशिकेसोबत भरलेली रु.१,०००/- ची अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल.

(८) परिक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम राहील, याची जाणीव ठेऊन त्याबाबत आम्ही शासनाशी कोणताही पत्रव्यवहार किंवा चर्चा करणार नाही.

स्वाक्षरी

स्थळ : संस्था अध्यक्ष/सचिव

दिनांक : (रबरी शिक्क्यासह)

## कलाकारांचा पात्रपरिचय

| अ.क्र. | कलाकारांची नावे | वय | भूमिका |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |
| ७. | | | |
| ८. | | | |
| ९. | | | |
| १०. | | | |
| ११. | | | |
| १२. | | | |
| १३. | | | |
| १४. | | | |
| १५. | | | |
| १६. | | | |
| १७. | | | |
| १८. | | | |
| १९. | | | |
| २०. | | | |
| २१. | लेखक- | | |
| २२. | दिग्दर्शक- | | |
| २३. | प्रकाश- | | |
| २४. | नेपथ्य- | | |
| २५. | रंगभूषा- | | |

संस्थेचे नाव व शिक्का :-

# १५ वी महाराष्ट्र राज्य बालनाटय स्पर्धा, २०१७-२०१८

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्था/शाळा/विद्यालय यांना निर्मितीखर्च रु.६,०००/- तसेच संस्था/शाळा/विद्यालय हे बाहेरगावचे असल्यास त्यांना देय होणारी प्रवासखर्च व दैनिक भत्त्याची रक्कम स्पर्धा संपन्न झाल्यानंतर संस्थेच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. संस्था/शाळा/विद्यालय यांनी खालीलप्रमाणे बँक खात्याचा तपशिल आणि रद्द केलेला धनादेश सोबत जोडावा.

| | |
|---|---|
| खातेधारक संस्थेचे नाव | |
| बँक खाते क्रमांक (A/C No.) | |
| IFSC CODE | |
| ब्रँच (Branch) | |

**संस्थेचा रद्द केलेला धनादेश येथे जोडावा.**